IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# ग्रामीण साहित्य प्रेरणा व स्वरूप

नावः दळवे अतुल तानाजी

संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग,

वसंतदादा पाटील महाविद्यालय,

पाटोदा, जि. बीड.

## प्रास्ताविकः-

'ग्रामीण साहित्य' ही संकल्पना फार जुनी असली तरी या संकल्पनेविषयी १९६० नंतर टीकात्मक चर्चा होऊ लागली. कारण मराठी साहित्य हे मध्ययुगीन काळापासून संत, पंत आणि तंत अशा कवितेच्या स्वरूपात वाटचाल करीत आहे; परंतु या साहित्याला ब्रिटिशांच्या काळांत एक वेगळेच रूप प्राप्त झाले आणि मूळ पद्यात्मक स्वरूपात बदल होऊन गद्य स्वरूपातील वाङ्मयप्रकरात साहित्य उदयास येऊ लागले. हा गद्य वाङ्मय ब्रिटिशांच्या कालखंडात विस्तारले असले तरी त्याचे मूळ हे जातक कथांमध्ये आढळून येते. कारण जातक कथांच्या सहाव्या खंडात दहा दीर्घ स्वरूपात शब्दबध्द आहेत. यावरून पाश्चात्य कादंबरी तंत्राच्याही अगोदर भारतामध्ये गद्य स्वरूपात लेखन केले जात असल्याचा प्रत्यय येतो. सन १८०० ते १८७४ सालापर्यंत मराठी लिहिले गेले नाही; परंतु या कालखंडात पूर्वीच्याच संस्कृत आणि अरबी भाषातील अनेक ग्रंथांची मराठी भाषांतरे झाली. त्यामुळे या कालखंडाला 'भाषांतर युग' संबोधले गेले. सन १८८५ पासून मराठी साहित्यात केशवसुत यांच्या रूपाने एक नव्या क्रांती युगाचा प्रारंभ झाला केशवसूत पंचकानंतर तांबे संप्रादयाचा उदय झाला. त्यांनी गीतकाव्य निर्माण केले आणि केशवसूत यांच्या तुतारीला अधिक प्रभावी केले. याच काळातील राजकीय घडामोडीचा परिणाम एकुण वाङ्मय लेखनावर झाला. त्यामुळे नागरी भागातील साहित्यिक मंडळी ग्रामीण भागाकडे वळली. परिणामी त्यातून त्यांनी ग्रामीण भागातील माणसांचे भावविश्व रेखाटण्यास प्रारंभ झाला.

कोणतेही साहित्य उदयास येण्यामागे विविध प्रेरणांचा सहभाग असतो. विविध कालखंडात त्यावेळच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडीमध्ये होणा-या बदलांचा साहित्यावर अप्रत्यक्षपणे परिणाम होऊन मराठी साहित्य बदलत गेले. त्यामध्ये ग्रामीण साहित्यातही मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत. मुळातच ग्रामीण साहित्याची नाळ ही ग्रामीण जीवनाशी जोडलेली असल्याने ग्रामीण जीवनावर काही अंशी परिणाम झाला तरी त्याचे पडसाद ग्रामीण

साहित्यावर होतात आणि पुढे एक नवे वळण घेणारे साहित्य उदयास येते.. त्यामुळे काळानुसार झालेले बदल साहित्य निर्मितीला दिशा देतात. या दिशा साहित्याला प्रेरणा देण्याचा प्रयत्न करत असतात. त्यामुळे ग्रामीण साहित्यांच्या प्रेरणांचा विचार घेतल्याशिवाय ग्रामीण साहित्य आणि ग्रामीण समाज जीवन यांचा किती जवळचा सहसंबंध आहे हे लक्षात येते.

ग्रामीण साहित्य निर्मितीला महात्मा फुले यांच्या चळवळीची प्रेरणा आहे. म. फुले यांनी १८२७ ते १८९० या कालखंडात त्यांनी सामाजिक भूमिका घेऊन आपले विचार मांडले. त्यांनी प्रामुख्याने शेतकरी, मजूर, स्त्रिया आणि अस्पृश्य यांच्या विकासावर भर दिला. हा समाजातील वर्ग उपेक्षित का राहिला याच्या मुळापर्यंत जाण्याचा प्रयत्न केला. म. फुले यांनी या उपेक्षितांना जागृत करून त्यांना हक्काची जाणीव करून देण्याचे महत्त्वाचे कार्य केले. महात्मा फुले यांच्या अमूल्य कार्यासंदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे लिहितात की, 'शेतक-यांचा आसूड' या ग्रंथात शासकीय कर्जधारक शेतक-यांच्या दैन्य अवस्थेचे, त्यांच्या हतबल मनोवस्थेचे, त्यांच्या घराचे इतके वास्तवदर्शी वर्णन केले आहे की, त्यामधून म. फुलेंच्या सुप्तावस्थेत असलेल्या ललित लेखकाची ओळख पटावी. आधुनिक ग्रामीण साहित्याची बीजे पहिल्यांदा दिसतात. ती या 'शेतक-यांचा आसूड' मध्ये होय." वासुदेव मुलाटे यांच्या मतानुसार ग्रामीण साहित्याच्या निर्मितीची प्रेरणा महात्मा फुले यांची आहे. त्यांच्या प्रेरणेतूनच कृष्णराव भालेकरांनी 'बळिया पाटील' ही कादंबरी लिहिली तर यानंतर काही कालावधीतच धुनर्धारी यांनी 'पिराजी पाटील' अशा ग्रामीण कादंब-यांचा जन्म झाला.

महात्मा फुले यांची 'अखंड' ही कविता ग्रामीण चित्रण घेऊन आली. नंतर त्यांनी खेड्यातील माणसांना अत्यंत सहजपणे समजणा-या जलशांचा शब्दरूप आविष्कार केला. या काळात निर्माण झालेल्या साहित्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव असलेला दिसतो. यासंदर्भात डॉ. नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "म. फुले महाराष्ट्रातील पहिले कर्ते सुधारक, नव्या दृष्टीने जीवनाकडे पाहणारे सुधारक. या दृष्टीमुळेच त्यांच्याही नकळत त्यांनी ग्रामीण जीवनाचा समर्थ आविष्कार केला आहे. हा मराठीतला पहिला ग्रामीण आविष्कार म्हणायला काय हरकत आहे?" अर्थात महात्मा फुले यांच्या प्रेरणेचे ग्रामीण साहित्य निर्मितीला प्रारंभ झाला; परंतु त्याचे स्वरूप फार मर्यादित होते. पुढील काळात प्रेरणा आणि स्वरूपातही आमूलाग्र बदल झालेला दिसतो.

सन १९२० नंतर टिळक युगाचा अस्त होऊन गांधीयुगाचा प्रारंभ झाला. या काळात गांधीजींनी आंदोलनाचा प्रारंभ केला आणि त्यांचे लक्ष 'खेड्याकडे चला' अशी हाक देऊन दांडीयात्रेच्या निमित्ताने ग्रामीण आणि शहरी यातील अंतर कमी करून योग्य तो समन्वय घडवून आणला. परिणामी ग्रामीण आणि शहरी लोक एकोप्याने सहभागी झाले. महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभावाने सर्वच क्षेत्रात परिवर्तने घडून आली. परिणामी साहित्यिकांची दृष्टी खेड्याकडे वळली. खेड्यातील लोकांचा उध्दार झाला पाहिजे असे लेखकांना वाटू लागले. खेड्यातील सामाजिक विषमता, दारिद्र्य, अज्ञान नष्ट होऊन समानतेच्या भूमिकेने वागविले

पाहिजे. तेथे समाजोध्दार करण्यास भरपूर वाव असे विधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. अशा जाणिवांनीच ग्रामीण साहित्य निर्माण होऊ लागले.

महात्मा गांधीजींच्या प्रेरणेतून भा. वि. वरेरकर, ग. ल. ठोकळ, वि. वा. हडप, भा. रा. तांबे, कवी गिरीश आणि यशवंत इत्यादी साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून ग्रामीण चित्रण पाहिजे तेवढ्या वास्तवपणे येत नाही. कारण या साहित्याला कुठेतरी मनोरंजनाची जोड असलेली दिसते. तरीही आजपर्यंत मराठी साहित्याला पारखा असणारा समाज दाखवून दिली. म्हणून या कालखंडातील ग्रामीण साहित्याचे महत्त्वपूर्ण कार्य आहे.

इ.स. १९४० नंतर ग्रामीण साहित्याला ख-या अर्थाने वास्तववाचे भान आलेले दिसते. यास काळात सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अधिक प्रमाणात बदल झाले. परिणामी ग्रामीण समाज आणि संस्कृतीमध्येही बदल झाले. उपेक्षित, अस्पृश्यांच्या उध्दारासाठीच्या चळवळींनी चांगलाच जोर धरला. या सर्व बदलांचा परिणाम साहित्याचा झाला. याला ग्रामीण साहित्यही अपवाद राहिले नाही. या काळातील साहित्याला दोन दिशा मिळाल्या होत्या. एक वास्तववादी आणि दुसरी मनोरंजनवादी होय. र. वा. दिघे आणि ग. ल. ठोकळ यांच्या लेखनात थोडे वास्तव आणि थोडे काल्पनिक जीवन चित्रण आले. त्यामुळे ग्रामीण साहित्याला एक नवे वेगळे वळण मिळाले. त्यांच्या साहित्य आविष्कारातून अद्भुतरम्यता, कल्पकता, काव्यमयता, निसर्गवर्णन, ग्रामवास्तव इत्यादीची जोड त्यांनी दिली.

सन १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्यामुळे विविध धोरणे अंमलात आणले गेले. त्यामुळे विविध क्षेत्रात सत्तेत विभाजन झाले. या सर्व बदलांचा परिणाम साहित्यावर झाला. याच काळात राज्यघटनाही अस्तित्वात आली त्यामुळे विविध परिवर्तने झाली; परंतु काही समस्या तशाच राहिल्या त्याचे चित्रण साहित्यातून आविष्कृत होऊ लागले. या कालखंडात वास्तव जीवन चित्रणाला विशेष स्थान प्राप्त झाले. त्यामुळे साहित्यिकांचा कल हा काल्पनिक मांडणीपेक्षा वस्तुस्थितीकडे गेलेला दिसतो. यासंदर्भात डॉ. वासुदेव मुलाटे लिहितात की, "सन १९४६ च्या आसपास एकूण मराठी साहित्यातच परिवर्तन झालेले दिसते. नवकविता, नवकथा असे शब्दप्रयोग करून त्यांची व्यवच्छेदक मांडणी येऊ लागली. मर्ढेकरांची नवकविता वास्तव सूक्ष्म आणि विविधांगाने चित्रित करणे महत्त्वाचे मानले जाऊ लागले. मानवी मनाच्या दर्शनाला, त्यांच्या ताणतणावाला महत्त्व देऊन लेखन होऊ लागले." अर्थात वास्तव जीवन रेखाटण्याला महत्व आले म्हणजेच या काळातील ही साहित्य लेखनाची प्रेरणाच म्हणता येते. ग्रामीण साहित्यानेही याच मानवी जीवनाच्या वास्तवाला चित्रित केलेले दिसते. तसेच ग्रामीण साहित्याच्या स्वरूपाला विकसित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य झाले.

सन १९६० नंतर नवीन जाणीवा आल्या आणि शिक्षकाच्या प्रसाराने ग्रामीण जीवनात अधिक प्रमाणात बदल झाले. राजकारणातील विविध घडामोडींमुळे शहरी आणि ग्रामीण भागातील माणसातील दरी कमी झाली. त्यामुळे शहराचे आकर्षण ग्रामीण भागातील तरुणांना वाटू लागले. त्यामुळे गाव ओस पडली. या सर्वांचा परिणाम ग्रामीण साहित्यनिर्मितीवर झालेला दिसतो. यासंदर्भात डॉ. आनंद यादव म्हणतात की, "या नव्या साहित्य प्रवाहातील साहित्य हे परिवर्तनवादी साहित्य असते. त्याला एका निश्चित स्वरूपात परिवर्तन हवे असते."

अर्थात यादव यांच्या मते, ग्रामीण साहित्य परिवर्तनाला महत्व देते. त्यामुळे ग्रामीण भागातील लेखकांनी लेखनाला जोमाने प्रारंभ केला. त्यामध्ये वामन होवाळ, रा. रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, द. ता. भोसले, आनंद यादव इत्यादीनी आपल्या साहित्यातून भ्रष्टाचार, भूक, ग्रामजीवन याला केंद्रस्थानी ठेवून लेखन केले. त्यामुळे ग्रामीण साहित्यामध्ये अमूलाग्र बदल झाला आहे. ग्रामीण साहित्य लेखनाला एक नवी दिशा मिळाली असे म्हणायला काही हरकत नाही.

## सारांश :-

एकूणच मराठी ग्रामीण साहित्याचा प्रारंभ अप्रत्यक्षपणे १९६० च्या आगोदर झाला आहे; परंतु त्या साहित्य ग्रामीण जीवनातील वास्तविकता मर्यादित स्वरूपात आविष्कृत झालेली आहे. १९६० नंतर स्वतंत्रपणे आविष्कृत होणा-या ग्रामीण साहित्यासची प्रेरणा आहे. काळानुसार होणारी परिवर्तन, महात्मा फुले यांचे साहित्य, महात्मा गांधींचा 'खेड्याकडे चला' संदेश केशवसुतांची विविध अंगांनी होणारे आणि स्वतंत्र्यानंतर विविध साहित्य प्रकारांचा स्वतंत्रपणे होणारा आविष्कार ग्रामीण साहित्य लेख्शनाची खरी प्रेरणा असल्याचे दिसून येते.

## संदर्भ :-

१. डॉ. यादव आनंद, '१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती, २००१.
२. डॉ. कोत्तापल्ले नागनाथ, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि दिशा', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, तृ. आ.२००७.
३. डॉ. मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप दिशा', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्र. आ. १९९४.
४. भोसले द. ता. 'ग्रामीण साहित्य : एक चिंतन', मेहता पब्लिशिंग, पुणे.
५. बोराडे रा. रं. 'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, दु. आ. २००५.